प्रेस नोट दिनांक :- २१/११/२०२६

<u>पवई पोलीस ठाणे ची उल्लेखनिय कामगिरी ०२ महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन मुलाचा दिल्ली येथे शोध</u>

दिनांक १५/०९/२०२६ रोजी दुपारी १५.१५ ते १५.३० वा. च्या सुमारास तुंगा गाव, साकीविहार रोड, पवई येथील 'दारुलउलूम मसोदिया गरीब नवाज मदरसा, सुन्नी रहेमानिया जामा मस्जिद' येथून १० वर्षीय अल्पवयीन मुलगा नामे 'अल्ताफ मुख्तारअली शाह' (मूळ रा. सैदाम चाळ, भास्कर नगर, कळवा, ठाणे) हा अचानक बेपत्ता झाला होता. पीडित बालक अवघ्या १० वर्षाचे कोवळे असल्याने मानवी तस्करी, बालमजुरी किंवा बालकाच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. घटनेचे गांभीर्य ओळखून फिर्यादी वडील 'श्री. मुख्तारअली शाह' यांच्या तक्रारीवरून दिनांक १६/०९/२०२६ रोजी पवई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९८९/२०२६, कलम १३७(२) भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ एका विशेष पथकाची नेमणुक करण्यात आली. गुन्हा दाखल होताच तपास पथकाने घटनास्थळ असलेल्या मदरशाचे प्रवेशद्वार, तुंगा गाव मुख्य रस्ता ते साकीविहार रोड, कांजूरमार्ग रेल्वे स्थानक, साकीनाका मेट्रो स्थानक, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड (JVLR) आणि मुख्य मार्गावरील बेस्ट बस थांब्यांच्या परिसरातील 'मुंबई पोलीस सीसीटीव्ही सर्व्हिलन्स प्रोजेक्ट' तसेच खाजगी दुकानदार, पेट्रोल पंप व हॉटेल्सचे शेकडो सीसीटीव्ही फुटेज तासंतास तपासले. यातून बालक स्थानिक हद्दीतून बाहेर पडल्याचे निष्पन्न झाल्याने तपासाची दिशा रेल्वे व आंतरराज्यीय मार्गाकडे वळविण्यात आली. सदरचा बेपत्ता बालकाचा लवकरात लवकर शोध लागावा याकरिता बालकाचे छायाचित्र व शारीरिक वर्णनासह 'फॉर्म -०३' जारी करण्यात आले. तसेच, 'NIC-MAIL' प्रणालीद्वारे बृहन्मुंबई व बृहन्मुंबई लगतच्या पोलीस ठाणेस, मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य आणि गुन्हे अन्वेषण विभाग (CID), पुणे यांच्यामार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्य व देशातील सर्व पोलीस आयुक्तालये, रेल्वे पोलीस (GRP) व नियंत्रण कक्षांना 'अर्जंट' बिनतारी संदेश (Flash Wireless Message)' प्रसारित करण्यात आले. याशिवाय, मुंबई पोलीस दलाच्या अधिकृत 'पोलीस नोटीस' (Police Notice)' व गॅझेटमध्ये प्रसिद्धीकरिता विहित नमुन्यात माहिती सादर करण्यात आली.

तपास पथकाने दिनांक ०३/११/२०२६ रोजी बालकाचे मूळ निवासस्थान असलेल्या 'आनंद नगर व भास्कर नगर, कळवा (ठाणे)' परिसरात जाऊन बाजारपेठा, रेल्वे स्थानक, धार्मिक स्थळे आणि सार्वजनिक भिंतींवर बालकाचे रंगीत छायाचित्र व संपर्क क्रमांक असलेली शेकडो माहिती पत्रके चिकटविली. त्यानंतर गुप्त बातमीदारांकडून बालक 'डोंबिवली' परिसरात दिसल्याची माहिती मिळताच पथकाने तात्काळ डोंबिवली गाठून मुख्य बाजारपेठ, रेल्वे स्थानक व फुटपाथवरील स्टॉलधारकांकडे चौकशी केली असता, काही स्टॉलधारकांनी सदर बालकास २-३ दिवसांपूर्वी पाहिल्याचे सांगितले. या महत्त्वपूर्ण कडीवरून पथकाने डोंबिवली पूर्व व पश्चिम परिसर पिंजून काढला. दिनांक ०४/११/२०२६ रोजी फिर्यादी वडिलांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्या मोबाईलद्वारे त्यांचे सर्व नातेवाईक व समाजाच्या विविध 'व्हॉट्सॲप ग्रुप्सवर (WhatsApp Groups)' व इतर सोशल मिडीयाचा वापर करून बालकाचे छायाचित्र व पोलीस ठाण्याचे संपर्क क्रमांक प्रसारित करून जनसहभागातून माहिती संकलित करण्याची प्रभावी यंत्रणा राबविण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत सदरचा बेपत्ता अल्पवयीन मुलगा हा मोहम्मदपूर, दिल्ली या ठिकाणी असल्याची माहिती प्राप्त होताच नमुद विशेष पथक हे तात्काळ दिल्ली या ठिकाणी त्याच्या नातेवाईकांसह रवाना झाले व नमुद बालकास '' **<u>आर. के.पुरम, साऊथ वेस्ट, दिल्ली</u>** '' या ठिकाणी सुरक्षित ताब्यात घेण्यात आले. सदर बालकास ताब्यात घेतल्यानंतर बालकाकडे चौकशी केली असता त्याने त्याचा उदरनिर्वाह रेल्वे स्थानक तसेच बस स्थानक या ठिकाणी भिक्षा मागून केला असल्याचे सांगितले.

सदरच्या शोध मोहिमेअंतर्गत नेमणुक केलेल्या विशेष पथकाने मुंबई तसेच ठाणे परिसरातील साधारण १०० ते १५० सी.सी.टि.व्ही. कॅमेरे तपासणी केले. मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सर्व पोलीस ठाणेस माहितीपत्रक पाठविण्यात आले, विविध सोशल साईट्सचा व्हॉटसअप, फेसबुक, इन्स्टाग्राम इ. चा वापर करण्यात आला, पत्रकारांच्या संपर्कात राहून त्यांच्या मार्फतीने प्रसार करण्यात आला. सदरच्या अथक परिश्रमानंतर सुमारे ०२ महिने बेपत्ता असलेल्या मुलाचा शोध लावण्यास विशेष पथकास यश आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. देवेन भारती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. मनोजकुमार शर्मा पोलीस सह आयुक्त (का व सु) बृहन्मुंबई, मा.श्री. अभिनव देशमुख अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. दत्ता नलावडे पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ - ३, मा.श्री. दादासाहेब घुटुकडे सहाय्यक पोलीस आयुक्त, साकिनाका विभाग व मा. श्री. आत्माजी सावंत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुशांत बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक नवनाथ ढेकळे, स.फौ. शंकर चासकर व म.पो.शि. योगिता खुळे यांनी पार पाडली आहे.